सी.एस.आय., ए.आय.एम.एस. इन्स्टिट्यूशन चाप्टर, एंटरप्रिनरशिप डेव्हलपमेंट सेल आणि सांस्कृतिक समिती यासारख्या परिसंस्थेत विविध समित्या आहेत ज्याद्वारे परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी क्लब कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसोबत या समिती आणि त्यांच्या क्रियाकलापांची ओळख करून देण्याबाबतचे सत्र अतिरिक्त - अभ्यासक्रम माध्यमातून परिचय हे होते.

व`ग व`ग ७७१ समित्यांच्या प्रमुखांना संबंधित समितीची उद्दीष्टे आणि परिसंस्थेमध्ये या समित्यांनी आयोजित केलेल्या सर्व प्रमुख कार्यक्रमांची ओळख करून देण्याचे काम सोपविण्यात आले होते. विविध समिती प्रमुखांनी या समित्यांचे असण्याचे फायदे समजावून त्यांनी विद्यार्थ्यांना या समित्यांचे सदस्य होण्यासाठी प्रवृत्त केले. सदर सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना वर्षभर परीसंस्थेतून अभ्यासक्रम आणि सह-अभ्यासक्रमाच्या उपक्रमांबद्दल अंतर्दृष्टी प्राप्त झाली.

यानंतर पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मागील १२ वर्षांतील पदवी उत्तीर्ण होऊन विशेष नामांकीत कंपन्यांमध्ये उच्च पदावर नोकरीला असलेले विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या व तांत्रिक यशोगाथा ऐकवल्या. परिसंस्थेतील उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधांचा पदवी शिक्षणातील विद्यार्थ्यांनी पूर्णपणे वापर करता यावा यासाठी त्यांना आवाहन परिसंस्थेच्या प्लेसमेंट समिती सदस्यांकडून करण्यात आले.

एका आठवड्याच्या ऑनलाइन इंडक्शन प्रोग्रामच्या शेवटच्या दिवशी इन्स्टिट्यूटच्या स्थापनेपासून ते आतापर्यंतची प्रगती पदवी विभागाचे विविध उपक्रम, सर्टिफिकेट्स ,नोकरी करत असलेले माजी विद्यार्थ्यांची यादी इ. घटकांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे परिचय करून विद्यार्थ्यांना माहिती दिली.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंडक्शन प्रोग्राम समन्वयक प्रा. दिनेश बोरसे यांनी परिश्रम घेतले, तसेच कार्यक्रमाच्या संयोजनासाठी प्रा. कौस्तुभ सावंत, प्रा. मोनाली किल्ले, डा. निलिट पाटील, प्रा. सचिन सुरवाडे, प्रा. अमर गौर, डा. योगेश सोनिस, डॉ. लक्ष्मीकांत शर्मा, डॉ. दादू मराठे, प्रा. सुनिलकुमार बनवत, प्रा. विजय वर्मा, प्रा. सुनित सावळे, डा. हेमलता बहरुपे, प्रा. मोनाली किल्ले, प्रा. निलिट पाटील यांचे सहकार्य लाभले.

लोकमत

१२ तासांहून अधिक वेळ चालली मतमोजणी प्रक्रिया

विद्यापीठ प्राधिकरण निवडणूक : प्राचार्य गटात तीन संवर्गातील पदे रिक्त, बिनविरोध निकाल लागले पण बाद मतेही अधिक





महाविद्यालयीन अध्यापक गट

शिक्षकांच्या मतमोजणीने सुरुवात

व्यवस्थापन प्रतिनिधी गट, दोन उमेदवार बिनविरोध

विजयी उमेदवारांना प्रमाणपत्र

मतमोजणीत प्रथमच महिलांचा सहभाग

विद्यापरिषद

प्राचार्य गट, दोन उमेदवार बिनविरोध

पुण्य नगरी

एन.मुक्टो ९, एन.मुक्ता २, विकासमंच ४ जागांवर विजयी

विद्यापीठाच्या अधिसभेवर निशांत रंधे, संजय पाटील, के बी. पाटील, संजय सुराणा, वैशाली पाटील विजयी



जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेच्या व्यवस्थापन प्रतिनिधीमधून संजय पाटील, निशांत रंधे, विकास पवार हे विजयी झाले तर विद्यापीठ अध्यापकांमधून प्रा. किसनराव पवार, प्रा. अनंत पाटील यांनी विद्यापीठ अध्यापकांमधून प्रा. वर्षा पाटील, प्रा. सुरेखा पालवे आणि अध्यापकेतरमधून नारायण सुराणा, एस.एन. भारंबे, किशोर पाटील, सुलोचना पाटील, वासुदेव पाटील हे विजयी झाले आहेत. पदवीधर विद्यापरिषदेच्या पदवी पात्रधारक या गटात राखीव हे विजयी झाले. सर्वसाधारण प्रवर्गातील पदवीधरमधे मात्र रंगतदार लढत होऊन अखेरच्या फेरीत विजयी उमेदवार ठरले.

मतमोजणी सकाळी विद्यापीठाच्या कवयित्री पदवत्तर विद्यापीठ प्रशिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रारंभ झाला. सकाळी १० वाजता कुलसचिव डॉ. व्ही.एल. पाटोदकर, उप-कुलसचिव डॉ. एस.टी. इंगळे आणि प्रवेशद्वार व व्यासपीठावरील प्रतिनिधींच्या उपस्थितीत विजयी घोषणांनी सुरुवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलगुरुपदाचे डॉ. विनोद पाटील यांनी उपस्थित प्रतिनिधींना निवडणूक प्रक्रिया समजावली.



सदर टेबलांवर सर्वसाधारणच्या फेऱ्या घेण्यात आल्या. पैकी अंतिम अधिक सर्वसाधारण मतदार विजयी घोषित करण्यात आला. प्रथम पसंतीच्या मतांचा कोटा निश्चित करण्यात आला. प्रथम पसंतीच्या मतांमध्ये कोणीही कोटा पूर्ण न केल्याने सर्वात कमी मते असलेल्या उमेदवारांना बाद करण्यात आले. त्यांना मिळालेली मते दुसऱ्या पसंतीच्या उमेदवारांना देण्यात आली. अशा पद्धतीने फेऱ्या घेण्यात आल्या. विद्यापीठ अधिसभेसाठी २ जागा आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलगुरुपदाचे डॉ. विनोद पाटील यांनी उपस्थित प्रतिनिधींना निवडणूक प्रक्रिया समजावली. सकाळी ११ वाजता विद्यापीठ अध्यापक मतदार संघातील मतांच्या फेऱ्या घेण्यात आल्या. विद्यापीठ विकास मंडळाच्या अधिसभेसाठी २ जागा आहेत. त्यासाठीच्या अध्यापकांच्या मतदार संघातील ५९ पैकी ५५ मते वैध ठरली. प्रा. विकास पवार यांना ३१ मते प्राप्त झाली तर प्रा. रामकृष्ण बिरारी यांना २४ मते प्राप्त झाल्यामुळे प्रा. विकास पवार यांना विजयी घोषित करण्यात आले. पदवीधर संघातील प्रा. किसनराव यांना ३० तर प्रा. पवित्रा पाटील यांना २१ मते प्राप्त झाली. एक मत अवैध ठरले. प्रा. किसनराव यांना विजयी घोषित करण्यात आले. सुरुवात संघातील ६ जागांसाठी रिंगणात असलेल्या १९ उमेदवारांपैकी ९ उमेदवार निवडीत करण्यात आले. प्रा. अनंत ईश्वरे यांना २५, प्रा. अनंत पाटील यांना ३१ तर डॉ. सुरेखा पालवे यांना सुरुवात मते प्राप्त झाली. (पान ४ वर)

एन.मुक्टोचे ९ जागा : प्रतिनिधी

यात विद्यापीठातील अध्यापकांमधून प्रा. वर्षा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, विकासमंचमधून अधिसभेसाठी प्रा. विकास पवार, संजय पाटील, मंजय पाटील, अध्यापक मतदार, व्यवस्थापन परिषदेवर डॉ. सुलोचना बाविस्कर, डॉ. प्रवीण नन्नवरे, हेमंत पालवेसह ९ उमेदवार एन.मुक्टोचे विजयी झाले. अध्यापकेतर मतदारांमधून सुरुवातीच्या विजयी अध्यक्ष प्रतिनिधी पदवी विजयी झाले.

एन.मुक्ताचे २ उमेदवार विजयी

प्रवीण एस.डी. पाटील व प्रवीण पाटील हे दोन उमेदवार एन.मुक्ताचे विजयी झाले. अध्यापकांमधून महिलेचे निवडून आलेले विजयी ठरले.

Date: Dhule Edition
Jan 11, 2023 Page No. 01
Powered by : e-epaper.com

आर. सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत उद्योजक विकास परिषद संपन्न

स्वतंत्र भारत

शिरपूर । प्रतिनिधी



आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेमध्ये 'उद्योजकता विकास' या विषयावर दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी एस. एम. पटेल ऑडीटोरियम हॉल मध्ये कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'के. सी. आय. आय. एल' आणि आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेच्या उद्योजकता मंचाद्वारे सेमिनारचे आयोजन करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. नंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रा.डॉ.भूषण चौधरी (के. सी. आय. आय. एल संचालक व समन्वयक), डॉ.राजेश जावळेकर (संचालक के. सी. आय. आय. एल), केवल थोरात (व्यवस्थापक के. सी. आय. आय. एल) यांच्या समवेत परिसंस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. वैशाली पाटील, सहसंचालक एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा.मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रा.डॉ. मनोज पटेल, पदवी विभाग प्रमुख प्रा.डॉ. तुषार पटेल उपस्थित होते.तर 'के. सी. आय. आय. एल' चे संचालक प्रा. डॉ.भूषण चौधरी यांनी उद्योजक बनण्यासाठी कोणकोणत्या संसाधनांची आवश्यकता असते, बाबत सांगितले.कार्यक्रमाच्या सुरवातीला आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. मनोज पटेल यांनी उद्योजकता विकासासाठी इंस्टीटयूटचे उपक्रम प्रस्तावनेतून मांडले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.रुपालीअग्रवाल यांनी केले. प्रा.प्रियंका सैंदाणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी परिसंस्थेचा संचालिका प्रा.डॉ.वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.प्रियांका भंडारी, प्रा.डॉ.लक्ष्मीकांत शर्मा, प्रा.अमित पाटील, प्रा.कौस्तुभ सावंत, प्रा.डॉ.रुपालीअग्रवाल, प्रा.प्रियंका सैंदाणे, प्रा.ऐश्वर्या पाटील आदींनी प्रयत्न केले.

पुण्य नगरी

पटेल महाविद्यालयातील बीसीएचे विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

शिरपूर : येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बी. सी.ए. विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठस्तरीय परीक्षेत उत्तम यश मिळवित विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्य पटकावले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठस्तरीय परीक्षेचा प्रथम वर्षाचा निकाल १०० टक्के निकाल लागला. राजपूत सूचित १० सी.जी.पी.ए. गुण, बोरसे ऋषीकेश १० सी.जी.पी.ए., भोई गणेश १० सी.जी.पी.ए., चौधरी भाग्येश १० सी.जी.पी.ए., देवरे दीपक १० सी. जी.पी.ए., गिरासे दिव्येश १० सी. जी.पी.ए., गिरासे किशोर १० सी. जी.पी.ए., कुलकर्णी संकेत १० सी. जी.पी.ए., माळी नेहा १० सी.जी.पी.ए., पाटील गायत्री १० सी.जी.पी.ए., पाटील केतन १० सी.जी.पी.ए., पाटील कृणाल १० सी.जी.पी.ए., पाटील उर्मिला १० सी.जी.पी.ए., राजपूत दिया १० सी. जी.पी.ए., शिंदे महेश १० सी.जी.पी.ए., सोलंकी पार्थ १० सी.जी.पी.ए., वाडेकर हर्षीकेश १० सी.जी.पी.ए. या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह उमवि गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षणमंत्री आ. अमरिशभाई पटेल, नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ .डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव, डॉ. ए. एम. पाटील, विभागप्रमुख डॉ. एस. पी. पाटील यांनी कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रा. आर. ए. माळी, डॉ. आर. पी. अग्रवाल, प्रा. ए. व्ही. तिर्थाप, प्रा.ए.व्ही. जगताप, प्रा. एस. एस. वेशी, प्रा. एम. आर. राजपूत, गणेश सोनार, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, संदेश राजपूत, डी. यु. पटेल, लक्ष्मीकांत मोरे, हंसराज कढरे, अनिस बेग यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

आर. सी. पटेल आय.एम.आर.डी.मध्ये इंडक्शन प्रोग्राम



शिरपूर - येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट परिसंस्थेत पदवी अभ्यासक्रमातील बी.सी.ए., बी.बी.ए., व बी.एम.एस. प्रथम वर्षातील नव्याने प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.

इंडक्शन प्रोग्राममध्ये कॅम्पस अभिमुखता, शैक्षणिक अभिमुखता, ऑनलाईन टीचिंग ॲड लर्निंग, ऑनलाइन लायब्ररी सेवा, अंतर्गत आणि बाह्य परीक्षा प्रणाली, सर्टिफिकेट कोर्सेस, विविध समित्यांची कार्यरचना, डायग्नोस्टिक टेस्ट आणि मॅनेजमेंट गेम्स आदी उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमात पदवी अभ्यासक्रमातील बी.सी.ए., बी.बी.ए., च्या ३९५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. इंडक्शन प्रोग्रामच्या प्रथम दिवसाच्या पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांचे स्वागत केले गेले. विद्यार्थ्यांसाठी नियोजित केलेल्या विविध उपक्रमांची संकल्पना आणि त्यामागील उद्दीष्टेदेखील विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना परिसंस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या इतिहासासह परिसंस्थेत उपलब्ध असलेल्या विविध संधींची व सुविधांची माहिती देण्यात आली. आय.एम.आर. डी. आपल्या विद्यार्थ्यांना नियमित पूर्णवेळ पदवी व पदविका अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रदान करते. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची माहिती आणि फायदे यासंबंधी प्राध्यापकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमा व्यतिरिक्त ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्याचे आवाहन करण्यात आले. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी क्षमतेचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने, डायग्नोस्टिक टेस्ट घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषा आधिग्रहण क्षेत्रातील समस्या आणि अंतर ओळखण्यास मदत याचणीमुळे झाली. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी बरेच कार्यक्रम आयोजित करण्यात येतात, याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंडक्शन प्रोग्राम समन्वयक प्रा. दिनेश बोरसे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी प्रा.कौस्तुभ सावंत, प्रा.मोनाली किरंगे, प्रा मिलिंद पाटील, प्रा. सचिन सुराणा, प्रा.अमर गौर, प्रा. योगेश सेठिया, डॉ. लक्ष्मीकांत शर्मा, डॉ. दगडू मराठे, प्रा.सुफियान बागवान, प्रा.विजय गर्गे, प्रा.सुमित सगळे, प्रा.हेमलता बडगुजर, प्रा.मोनाली किरंगे, प्रा.मिलिंद पाटील यांचे सहकार्य लाभले.

Smart Dhule Edition
Nov 11, 2022 Page No. 03
Powered by : eReleGo.com

देशोन्नती

आर.सी. पटेल संस्थेच्या हिंदी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट परिसंस्थेत विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम

देशोन्नती वृत्तसंकलन...



शिरपूर n येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट परिसंस्थेत पदवी अभ्यासक्रमातील बी.बी.ए., बी.बी.ए., व बी.एम.एस. प्रथम वर्षातील नव्याने प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली चाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना नवीन वातावरणाशी आणि परिसंस्थेच्या संस्कृतीशी परिचित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते. इंडक्शन प्रोग्राममध्ये कॅम्पस अभिमुखता, शैक्षणिक अभिमुखता, ऑनलाईन टीचिंग ॲंड लर्निंग, ऑनलाइन लायब्ररी सेवा, अंतर्गत आणि बाह्य परीक्षा प्रणाली, सर्टिफिकेट कोर्सेस, विविध समित्यांची कार्यरचना, डायग्नोस्टिक टेस्ट आणि मॅनेजमेंट गेम्स अशा माहितीपूर्ण व मनोरंजक उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमात पदवी अभ्यासक्रमातील बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस. प्रथम वर्षातील नव्याने प्रवेश मिळालेल्या ३९५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. इंडक्शन प्रोग्राम व्यवस्थित झाला आहे हे सुनिश्चित करण्यासाठी विविध कार्यक्रमांमधून प्राध्यापक आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात काम केले.इंडक्शन प्रोग्रामच्या प्रथम दिवसाच्या पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांचे स्वागत केले गेले. इंडक्शन प्रोग्राममध्ये विद्यार्थ्यांसाठी नियोजित केलेल्या विविध उपक्रमांची संकल्पना आणि त्यामागील उद्दीष्टे देखील विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना परिसंस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या इतिहासासह परिसंस्थेत उपलब्ध असलेल्या विविध संधींची माहिती देण्यात आली.इंडक्शन प्रोग्राममध्ये बीसीए, बीबीए आणि बीएमएसच्या विद्यार्थ्यांना आपापल्या अभ्यासक्रम आणि त्यामागील उद्दीष्टांचा परिचय देण्यात आला. प्राध्यापकांनी संबंधित कोर्सेस अभ्यासक्रम, वैकल्पिक विषय, इंटर्नशिप, संगणक प्रयोगशाळेसंबंधी माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांसाठी सर्वात महत्त्वाच्या स्त्रोतांमधील ग्रंथालय एक स्त्रोत असून, लायब्ररी सेवांवरील सत्रामुळे विद्यार्थ्यांना लायब्ररी सेवा कशा वापराव्या हे समजण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक आणि क्रीडाविषयक उपक्रमांवरील सत्रामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासा बरोबरच सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींची माहिती देऊन प्राध्यापकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.अंतर्गत आणि बाह्य परीक्षा प्रणाली आणि नियमांवरील सत्रात प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना अंतर्गत आणि बाह्य परीक्षा घोरणांबद्दल तपशीलवार माहिती दिली. प्राध्यापकांनी पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि क्रेडिट आणि ग्रेडिंग सिस्टम आणि परीक्षा योजनेबद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली. परिसंस्थेच्या एन.एस.एस. युनिट आणि स्वयंसेवकांनी प्रवेशकर्त्यांशी संवाद साधला आणि एन.एस.एस.च्या भाग म्हणून घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांविषयी त्यांना अद्ययावत केले. एन.एस.एस.ने सामुदायिक काम आणि समाजसेवेसाठी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दलही प्रवेशकर्त्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना एन.एस.एस.च्या विविध उपक्रमांची विस्तृत माहिती मिळाली.

Deshonnati Edition
Nov 11, 2022 Page No. 2
Powered by : eNewsPaper.com

दिव्य मराठी धुळे सिटी 11-11-2022

शिरपूरला बुद्धिबळ, कॅरम स्पर्धेला मिळाला प्रतिसाद

प्रतिनिधी | शिरपूर

येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचालित आयएमआरडी परिसंस्थेच्या स्पोर्ट्स अँण्ड हेल्थ क्लबतर्फे संस्थेतील विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांसाठी कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आली.

परिसंस्थेचे उपसंचालक व एमसीए व आयएमसीए विभागप्रमुख मनोज बेहेरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. कॅरम स्पर्धेत २५ विद्यार्थी व ७ शिक्षक तर बुद्धिबळ स्पर्धेत २१ विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले होते. कॅरम आणि बुद्धिबळ प्रशिक्षण कार्यशाळा क्रीडा संचालक पूजा जैन यांनी घेतली. या प्रशिक्षण कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना कॅरम आणि बुद्धिबळाच्या नियमांची माहिती करून देणे हा होता. मुलींच्या गटात कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रतिक्षा कैलास पाटील, द्वितीय क्रमांक पलक महेंद्र सनेर, तृतीय क्रमांक पूर्वी अंबादास गिरासे यांनी पटकावला. बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक स्नेहा रवींद्र पाटील, द्वितीय क्रमांक राजश्री दिलीप पाटील व तृतीय क्रमांक जयश्री भटू पाटील यांनी पटकावला. मुलांच्या गटात कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक द्वारकेश प्रदीप कुलकर्णी, द्वितीय क्रमांक सिजल उमाकांत सनेर व तृतीय क्रमांक बोरसे सुनीत नितीन यांनी पटकावला. बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक कासार ओमकार प्रमोद, द्वितीय क्रमांक रोकडे नीलेश आधार व तृतीय क्रमांक राजपूत ओमकारसिंग श्यामसिंग यांनी पटकावला. कर्मचाऱ्यांच्या गटात कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक सागर जाधव, द्वितीय क्रमांक महेश भावसार व तृतीय क्रमांक हिरल पटेल यांनी पटकावला. विजेते, उपविजेते व द्वितीय उपविजेत्यांना करंडक व प्रमाणपत्र देऊन परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या हस्ते गौरवण्यात आले. स्पर्धेचे आयोजन परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, उपसंचालक व एमसीए व आयएमसीए विभागप्रमुख प्रा. मनोज बेहेरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.



स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धक.

देशदूत
गुरुवार 12.1.2023

पटेल आयएमआरडीच्या एमसीएचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत

■ शिरपूर । प्रतिनिधी



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. यात आर.सी.पटेल आयएमआरडी परिसंस्थेतील पाच विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत परिसंस्थेची परंपरा कायम राखली.

एमसीए अंतिम वर्षे परिसंस्थेतील कुणाली रविंद्र चौधरी हिने १०.०० ग्रेड मिळवून विद्यापीठात प्रथम, अनिकेत विलास सनेर १०.०० ग्रेड विद्यापीठात द्वितीय, स्मितल राजेंद्र महाजन १०.०० ग्रेड विद्यापीठात तृतीय स्थान मिळविले.

इंटीग्रेटेड एमसीए अंतीम वर्षामधून परिसंस्थेतील सचिन सेजीलाल गोले ९.८५ ग्रेड विद्यापीठात प्रथम, मानसी अभय पाटील ९.७६ ग्रेड विद्यापीठात द्वितीय स्थान मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आमदार अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, प्रा.मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी कौतुक केले.

विद्यार्थ्यांना डॉ. मनोज सोमवंशे, प्रा.अमित पाटील, प्रा. विशाल पवार, प्रा. छाया पाटील, प्रा. रोहीणी पाटील, प्रा. राहुल बडगुजर, प्रा. दिपाली महालपुरे, प्रा. विठ्ठल पाटील, प्रा. पुजा म्हस्के, प्रा. धनश्री पाटील, प्रा. ऐश्वर्या पाटील या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

विद्यापीठावर शिरपूर तालुक्याचा दबदबा

सिनेटसह विविध मंडळांवर प्रथमच एकाचवेळी ९ जणांना संधी


डॉ.संजय सुराणा


डॉ. वैशाली पाटील


निशांत रंधे


डॉ.गजानन पाटील


डॉ.आर.एच. पाटील


डॉ. एल.एल.कादरी


डॉ.फुला बागूल


डॉ.ए.एम.पाटील


डॉ. दिनेश भवरूड

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर : येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, डॉ. वैशाली पाटील आणि विविध संस्थेचे सचिव निशांत रंधे यांची विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाली. विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी येथून ४, विद्या परिषदेवर ५, तर विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर ४ अशा एकूण ९ जणांची निवड करण्यात आली.

प्रथमच सिनेट सदस्य, विद्या परिषद व अभ्यास मंडळावर मोठ्या संख्येने निवड झाल्यामुळे विद्यापीठावर शिरपूरचा दबदबा राहणार आहे.

येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सिनेटवर, तर प्राचार्य मतदार संघातून निवडून आले. आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय. एम. आर. डी. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्राचार्य मतदारसंघातून विनविरोध निवड झाली. विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटांमधून निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठीचा निवडणूक कार्यक्रम विद्यापीठाने जाहीर केला होता.

विद्यापीठाच्या प्राध्यापक खुल्या गटातून सिनेट सदस्यपदी येथील एच. आर. पटेल महिला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील यांची निवड करण्यात आली, तसेच आर. सी. पटेल महाविद्यालयाचे डॉ. ए. एम. पाटील यांची भौतिकशास्त्र अभ्यास मंडळावर, तर याच महाविद्यालयातील डॉ. आर. एच. पाटील यांची मायक्रोबायोलॉजी अभ्यास मंडळावर सदस्यपदी निवड झाली. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, संस्थेचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, परिसंस्थेचे उपसंचालक प्रा. मनोज बेहेरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल, रजिस्ट्रार वैशाली गोरले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वागत केले.

विद्यापीठाच्या संस्था गटातून येथील किसान विद्याप्रसारक संस्थेचे सचिव निशांत विश्वासराव रंधे यांची सिनेट सदस्यपदी निवड करण्यात आली. विद्यापीठाच्या विद्या परिषद प्राध्यापक ओबीसी गटातून शहरातील एसपीडीएम कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. फुला बागूल यांची सदस्यपदी निवड झाली. तसेच डॉ. एस. एल.कादरी यांची विद्यापीठाच्या उर्दू अभ्यास मंडळ तर डॉ.दिनेश भवरूड यांची वाणिज्य आणि व्यावसायिक लॉ अभ्यास मंडळावर सदस्यपदी विनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा धुळे जि. प. चे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, कार्याध्यक्षा आशा रंधे, विश्वस्त रोहित रंधे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. एस. एन. पटेल, प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत यांनी स्वागत केले.

Jalgaon Main
Page No. 2 Jan 12, 2023
Powered by: enelego.com

आजपासून भामपूरला दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

शिरपूर/प्रतिनिधी

शिरपूर पंचायत समिती, तालुका मुख्याध्यापक संघ, तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघ व भामपूर येथील आर.सी. पटेल विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून भामपूर येथे दोन दिवसीय ४३ वे तालुकास्तरीय विज्ञान विज्ञान प्रदर्शन व शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न होणार आहे.

तालुकास्तरीय भामपूर येथील आर.सी.पटेल विद्यालयात आज दि.१२ रोजी सकाळी ११ वाजता विज्ञान प्रदर्शन उद्घाटन शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजेंद्रकुमार चंदुलाल मंत्री यांच्या शुभ हस्ते करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक चे शिक्षणाधिकारी मोहन वेंगडे असतील. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी राकेश साळुंखे, तहसीलदार जगन सोनवणे, बिलाल मिशन प्रकल्प संचालक महिला निर्मल संघ, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ.उमेश शर्मा, पुढे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आर.व्ही.पाटील सचिव उदय. डी. सोनवणे, उपाध्यक्ष डी.ए.चौधरी, दारासच्या प्रमुख सीमाने वसंतराव पवार, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक सुधाकर बागुल विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष पी.डब्ल्यू. कुंवर, संजय लोटन पवार उपस्थित राहणार आहेत.

दि.१३ रोजी दुसरी २ वाजता प्रशस्तिपत्रे व पारितोषिक वितरण समारंभ व प.स.चे गटशिक्षण अधिकारी एस.टी. सोनवणे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ.उमेश शर्मा असतील. प्रमुख अतिथी म्हणून पोलिस अन्नाराम उकलकार, बिलाल मिशन प्रकल्प संचालक महिनवार सीमाली उपस्थित राहतील. शिरपूर पीपल्स बँक चेअरमन पोपेश भंडारी, विविधांचे व्यवस्थापक के.डी.बाविस्कर, प्राचार्य पी.व्ही.पाटील, डॉ.मनोज निकम उपस्थित राहतील.

कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी एस.के. नागरगोजे, तालुका मुख्याध्यापक संघ अध्यक्ष एस.एस.बोरसे, भामपूर येथील पटेल विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.पी.वैद्य, मुख्याध्यापक संघाचे सचिव आर.एन.पवार, विज्ञान अध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष निलेश वेळदे, विस्तार अधिकारी सीमाली डॉ. निता सोनवणे, आर.के. नागरगोजे, डी.पी.बाविस्कर, सीमाली महिला बालविकास, डी.पी.कुवर, बी. एस. कुवर यांनी केले आहे.

सिनेट सदस्यपदी प्रा.पाटील यांची निवड

शिरपूर/प्रतिनिधी



आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आयएमआरडी फिजिओथेरपी संचलिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्रवर्गातून संवर्गातून सिनेट सदस्य पदावर बिनविरोध निवड झाली.

कार्यकारी परिषदेचे डॉ.पी.पी.पाटील यांनी महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटांमधून निवडून यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक घेण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (ब) नुसार प्रत्यक्षपणे मतदानातून सिनेटवर १० सदस्यांची निवड केली जाते.

दि. ८ रोजी अधिसभेची निवडणूक विद्यापीठामार्फत घेण्यात आली. त्यात महिला प्रवर्गातून डॉ. वैशाली पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विद्यापीठातून करण्यात आली.

त्यांच्या निवडीबद्दल संस्थाध्यक्ष डॉ.सुरेशभाई पटेल, डॉ.सविताताई पवार, मानद सचिवा सौ. जयश्रीबेन पटेल, मानद सचिव भूपेशभाई पटेल, उपाध्यक्षा दिप्तीबाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्रकुमार भंडारी, सचिव प्रा.डॉ.एस.एस.राजपूत, सहसचिव प्रा.एस.एस.पाटील, विश्वस्त प्रा.डॉ.के.बी.पाटील, सर्व संचालक व्यवस्थापन संस्थेतील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



पाहिजेत

करवंद नाका येथील शकुंतलाई पेट्रोलपंपावर कामासाठी (सेल्स बॉय) मुले पाहिजेत. कामाची वेळ ८ तास असेल. इच्छुकांनी संपर्क साधावा.

संपर्क : मोबा : ९८२२७५५२२३, ९८८१९७१४७४, ९५०३८१२५०१

देशोन्नती

संजय सुराणा व डॉ. वैशाली पाटील यांची उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ सिनेट सदस्यपदी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

शिरपूर - शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च चे प्राचार्य डॉ. संजय सुराणा हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्वोच्च मंडळ सिनेट वर, प्राचार्य मतदार संघातून निवडून आले आहेत. तसेच आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय. एम. आर. डी. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्राचार्य मतदार संघातून बिनविरोध निवड झाली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि व्यवस्थापन





प्रतिनिधींच्या गटांमधून निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक घेण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (ण) नुसार प्राचार्यांच्या गटामधून सिनेटवर १० सदस्यांची निवड केली जाते. दि. ८ जानेवारी २०२३ रोजी अधिसभेची निवडणूक विद्यापीठामार्फत घेण्यात आली. त्यात प्राचार्य (अनारक्षित) गटातून प्राचार्य डॉ. संजय सुराणा निवडून आले तर महिला प्राचार्य गटातुन डॉ. वैशाली पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल मंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील, सर्व संचालक, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य संस्थेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Deshonnati Edition
Jan 12, 2023 Page No. 3
Powered by : eNewsGo.com

प्राचार्य डॉ. संजय सुराणा, डॉ. वैशाली पाटील यांची सिनेट सदस्यपदी निवड





शिरपूर ★ खान्देश खबर वृत्त ★

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च चे प्राचार्य डॉ. संजय सुराणा हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्वोच्च मंडळ सिनेट वर, प्राचार्य मतदार संघातून निवडून आले आहेत. तसेच आर.सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर डी. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्राचार्य मतदार संघातून बिनविरोध निवड झाली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटांमधून निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक घेण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (ण) नुसार प्राचार्यांच्या गटामधून सिनेटवर १० सदस्यांची निवड केली जाते. दि. ८ जानेवारी रोजी अधिसभेची निवडणूक विद्यापीठामार्फत घेण्यात आली. त्यात प्राचार्य (अनारक्षित) गटातून प्राचार्य डॉ. संजय सुराणा निवडून आले तर महिला प्राचार्य गटातुन डॉ. वैशाली पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली.त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल आ. अमरिशभाई पटेल, आ. काशिराम पावरा, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, राजगोपाल भंडारी, प्रभाकरराव चव्हाण, डॉ. के. बी. पाटील, सर्व संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

सकाळ

प्राचार्य सुराणा, डॉ. वैशाली पाटील उमविच्या सिनेटवर

शिरपूर : येथील आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन अँन्ड रिसर्च महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सिनेटवर प्राचार्य मतदारसंघातून, तर आयएमआरडी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्राचार्य मतदारसंघातून बिनविरोध निवड झाली. ८ जानेवारीला झालेल्या सिनेट निवडणुकीत प्राचार्य (अनारक्षित) गटातून प्राचार्य डॉ. संजय सुराणा निवडून आले. महिला प्राचार्या गटातून डॉ. वैशाली पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली. संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतन पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकर चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील आदींनी स्वागत केले.



संजय सुराणा



वैशाली पाटील

Dhule, Dhule-Today
12/01/2023 Page No. 3

आर. सी. पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा व आय. एम. आर. डी. परिसंस्था संचालिका डॉ. वैशाली पाटील यांचीक.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ सिनेट सदस्यपदी निवड

स्वतंत्र भारत

शिरपूर। प्रतिनिधी



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च चे प्राचार्य डॉ. संजय सुराणा हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्वोच्च मंडळ सिनेट वर, प्राचार्य मतदार संघातून निवडून आले आहेत. तसेच आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय. एम. आर. डी. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांची महिला प्राचार्य मतदार संघातून बिनविरोध निवड झाली.कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटांमधून निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक घेण्यात आली.महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (घ) नुसार प्राचार्यांच्या गटामधून सिनेटवर १० सदस्यांची निवड केली जाते. दि. ८ नोव्हेंबरी २०२२ रोजी अधिसभेची निवडणूक विद्यापीठामार्फत घेण्यात आली. त्यात प्राचार्य (अनहिल)गटामधून प्राचार्य डॉ. संजय सुराणा निवडून आले तर महिला प्राचार्य गटातून डॉ. वैशाली पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली.त्यांना मिळालेल्या या सन्मानबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष सी. एम.पीकेश पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिनुभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजमोहन मंत्री, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ.के.बी. पाटील, सर्व संचालक, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य संस्थेतील सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2023-02-12 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

आर. सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत उद्योजक विकास परिषद

शिरपूर : येथील आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेमध्ये 'उद्योजकता विकास' या विषयावर २ रोजी एस. एम. पटेल ऑडीटोरियम हॉल मध्ये कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'के. सी. आय. आय. एल' आणि आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेच्या उद्योजकता मंचाद्वारे सेमिनारचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. नंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा.डॉ.भूषण चौधरी (के. सी. आय. आय. एल संचालक व समन्वयक), डॉ.राजेश जावडेकर (संचालक के. सी. आय. आय. एल), केवल थोरात (व्यवस्थापक के. सी. आय. आय. एल) यांच्या समवेत परिसंस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. वैशाली पाटील, सहसंचालक एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा.मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रा.डॉ. मनोज पटेल, पदवी विभाग प्रमुख प्रा.डॉ. तुषार पटेल उपस्थित होते. केवल थोरात यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त-गुण ओळखून उद्योजक बनले पाहिजे, असे सांगितले. डॉ. राजेश जावळेकर यांनी उद्योजक म्हणजे काय? उद्योजक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये कोणते गुण व कौशल्य असले पाहिजे हे सांगितले.

शिरपूरच्या आय.एम.आर.डी. परिसंस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात; विद्यार्थीनींचे उत्कृष्ट सादरीकरण

शिरपूर, दि.११- येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन रिदम-२०२३ उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका तथा माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, रिता पटेल, माजी नगराध्यक्षा संगीतातार्ई देवरे उपस्थित होते. याप्रसंगी परिसंस्थेच्या संचालिका डॉ.वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे उपसंचालक प्रा. मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ.तुषार पटेल, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली. विद्यार्थ्यांनी ग्रुप डान्स, गीत गायन, लावणी, नाटिका, भरतनाट्यम आदी कला आविष्कारांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. यात विविध सदाबहार गाण्यांवर धमाल नृत्य सादर झाले. विद्यार्थ्यांनी गीत गायन करून उपस्थितांची मने जिंकली. प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या सांस्कृतिक कार्यक्रमात परिसंस्थेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

बेटी बचाओ बेटी पढाओ या नाटिकाद्वारे विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी मराठमोळी लावणी नृत्य सादर करून महाराष्ट्राचा मराठी बाणा सादर केला. राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे गाव दत्तक घेण्यात आलेल्या बनावल गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ग्रुप डान्स कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.मनोज सोनावणे, अर्चना जडे, प्रा.केदार आपटे, प्रा.महेश भावसार, प्रा.प्रियांका सैंदाणे, प्रा.विठ्ठल पाटील, प्रा. विशाल पवार, प्रा.राहुल बड प्रा.प्रवीण पाटील, प्रा.५ सावंत ,डॉ.लक्ष्मीकांत शर्मा,

12.2.2023

आपलं महाराष्ट्र

देशोन्नती

कॅमेरा लेन्स



शिरपूर येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट रिसर्च अँड डेव्हलपमेंट परिसंस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन रिदम-२०२३ उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, रिता पटेल, माजी नगराध्यक्षा संगीतालाई देवरे, डॉ. वैशाली पाटील, संस्थेचे उपसंचालक प्रा. मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, डॉ. तुषार पटेल आदी

Deshonnati Edition
Feb 12, 2023 Page No. 1
Powered by : ePaper.com

पुण्य नगरी

पटेल आयएमआरडी परिसंस्थेचे प्रा.अमित पाटील यांना पीच.डी प्रदान



शिरपूर : येथील आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय. एम. आर. डी. परिसंस्थेतील एम.सी.ए. शाखेतील प्रा. अमित प्रकाशराव पाटील यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे विज्ञान शाखा अंतर्गत संगणक शास्त्र विषयात डॉक्टरेट पदवी प्रदान केली.

प्रा.अमित पाटील यांचा निसंदिग्धकः वर्ड सेन्स डिसअँबिग्युएशन फ्रेमवर्क फॉर मराठी हा संशोधनाचा विषय होता. यासाठी त्यांना मार्गदर्शक डॉ. हेमंत दरबारी आणि सहमार्गदर्शक प्रा. डॉ. राकेश रामटेके यांचे मार्गदर्शन मिळाले. सदर पीएच.डी. वाइवा स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स, क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विदयापीठ जळगाव येथे एक्सटर्नल रेफरी प्रा.डॉ.डी.एन.बेसेकर, अकोला, आय.एम.आर.डी. संचालिका प्रा. डॉ.वैशाली पाटील यांच्या सुपरविजन मध्ये झाला.माजी शिक्षणमंत्री आ. अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के.बी.पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा.मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी कौतुक केले.

Smart Dhule Edition
May 12, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com

आयएमआरडीतर्फे पथनाट्यातून 'सोशल मिडीया'बाबत जनजागृती



पथनाट्य सादर करताना आयएमआरडीचे पुरुष व महिला

शिरपूर/प्रतिनिधी

येथील आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आयएमआरडी परिसंस्थेत मास्टर ऑफ इंडिया (एम.एम.आय.) द्वारा 'सायबर सिक्युरिटी अवेअरनेस' या विषयावर परिसंस्थेतील आय.एस.सी.ए. अध्यासनांतर्गत द्वितीय व तृतीय वर्षातील एकूण २० विद्यार्थ्यांनी आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालय, एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालय, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अशा विविध ठिकाणांवर पथनाट्य सादर केले.या पथनाट्यात त्यांनी तरुण मंडळींनी आपली महत्त्वपूर्ण माहिती सोशल मिडीयावर टाकण्यापूर्वी विचारपूर्वक टाकावी अन्यथा त्या माहितीचा दुरुपयोग होऊ शकतो याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, अनोळखी मंडळींकडून बँकेची गुप्तित माहिती फोन द्वारे मिळवून आर्थिक फसवणूक होते त्याबद्दल जागरूक करणे महत्त्व आहे, पटीएम सिम कोड किंवा कुठलाही फसवाई या गुप्तित देवाने अशाच विविध मुद्यांवर या पथनाट्याद्वारे संदेश देण्यात आला.सायबर सिक्युरिटी अवेअरनेस या विषयावर पथनाट्य सादरीकरण कार्यशाळेचे परिसंस्थेचे संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एम.सी.ए. व आय. एम.सी.ए. विभागप्रमुख डा. स्मरोज बोरसे आणि सी.एस.आय. क्षेत्र को-ऑर्डिनेटर डा. ज्ञान पाटील यांनी विशेष परिश्रम घेऊन या पथनाट्याचे यशस्वीरीत्या सादरीकरण केले.

झाडे लावा झाडे लावा

रेशन तस्करांना वाचवतेय कोण?

(पान १ वरून) उघडली मेला तरी चालेल परंतु रेशन तस्कर जनता पार्टिने आरोप महसूल आणि पोलीस यंत्रणेची भूमिका असे का असावी याबाबत विचारला जात आहे.

यासंबंधात 'जनतेचे सरकार' मानणाऱ्या शासनकर्ते- मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देवून लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आतेपी पकडून अधिकाऱ्यांना न्याय दिला जातो की रेशन तस्करांनाच वाचविण्यासाठी नाटक केले जाते हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे !

जाहीर सूचना

जा.क्र. ३४२१
शिरपूर वरवाडे नगरपरिषद
दिनांक : १२/१२/२०२२

तमाम लॉरीधारक, टपरी मालक व इतर दुकानधारकांना सुचित करण्यात येते की, शिरपूर शहरातील बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राज्य मार्गावरील रस्त्यावर व शहादा रोडच्या लगत असलेल्या नगरपरीषदेचा सुविधा (सर्व्हिस रोड) रस्त्यावर ज्या दुकानधारकांनी दुकाने लावलेली असतील त्यांनी केलेले अतिक्रमण सात दिवसांच्या आत स्वत: काढून घ्यावीत अन्यथा नगरपरीषद व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर दुकाने काढण्यात येतील व येणारा खर्च आपणाकडून वसूल करण्यात येईल व अडथळा निर्माण केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उपविभागीय अभियंता
सार्व.बांधकाम उपविभाग, शिरपूर जि.धुळे

मुख्याधिकारी
शिरपूर वरवाडे नगरपरीषद, शिरपूर जि.धुळे

शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर

लोकमत

शिरपूर आयएमआरडी विद्यापीठात टॉपर

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर : शहरातील आर. सी. पटेल आयएमआरडी कॉलेजच्या एम. सी. ए व इंटिग्रेटेड एम. सी. ए. चे विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत टॉपर ठरले आहेत.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एप्रिल २३ या वर्षामध्ये घेतलेल्या परीक्षेची गुणवत्ता यादी फेब्रुवारी २४ मध्ये जाहीर केली. त्यामध्ये आर. सी. पटेल आय. एम. आर. डी परिसंस्थेतील एकूण १३ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत परिसंस्थेची परंपरा कायम राखली.

परिसंस्थेतील विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांत सतत गुणवत्ता यादीत चमकतात. एम. सी. ए. अंतिम वर्षामधून परिसंस्थेतील मोहम्मद उमरखान जहिर खान पठाण याने ९. ८३ ए. ग्रेड मिळवून विद्यापीठात प्रथम (गोल्ड मेडल), कोमल सुरेश पाटील हिने ९.७९ ओ.ग्रेड मिळवून विद्यापीठात द्वितीय


मोहम्मद पठाण


काजल पाटील


दिव्या वाणी


कोमल पाटील

स्थान मिळविले. इंटिग्रेटेड एम. सी. ए. अंतिम वर्षामधून परिसंस्थेतील दिव्या प्रकाश वाणी हिने ९.८९ ओ. ग्रेड मिळवून विद्यापीठात प्रथम, काजल चंद्रकांत पाटील हिने ९.७४ ग्रेड मिळवून विद्यापीठात तृतीय स्थान मिळविले.

यासाठी विद्यार्थ्यांना डॉ. मनोज सोनवणे, प्रा. अमित पाटील, प्रा. विशाल पवार, प्रा. छाया पाटील, प्रा. विठ्ठल पाटील, प्रा. रोहिणी पाटील, प्रा. राहुल बडगुजर, प्रा. दीपाली नहालदे, प्रा. धनश्री पाटील, प्रा. ऐश्वर्या पाटील, वैशाली गोरले, डी. यू. चौधरी, विशाल माहेश्वरी, कविता पाटील, नीलिमा पाटील, धीरज शेटे, दीपक बोरसे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल माजी शिक्षणमंत्री अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, डॉ. वैशाली पाटील, एम. सी. ए. प्रा. मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी कौतुक केले.

Hello Dhule
Page No. 3 Feb 13, 2024
Powered by: erelego.com

देशोन्नती

जागतिक एडस् जनजागृती पंधरवाड्यानिमित्त विविध उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

शिरपूर - येथील आर. सी. पटेल आय. एम. आर. डी. परिसरातील राष्ट्रीय सेवा योजना एकक, रेड रिबन क्लब, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच उपजिल्हा रुग्णालय, शिरपूर यांच्या सहकार्याने एडस्-आरोग्य या विषयाला अनुसरून जागतिक एडस् जनजागृती पंधरवाडा अंतर्गत विविध उपक्रम, प्रभातफेरी, मार्गदर्शन व चर्चासत्र, पोस्टर प्रेझेंटेशन, स्लोगन प्रेझेंटेशन, जनजागृती ब्रम्हमंचुषा या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आयसीटीसी विभाग समुपदेशक नानाभाऊ बहुजुर, शिरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे तंबाखू मोहिम माळी उपस्थित होते. सदर उपक्रमांची सुरुवात प्रभातफेरी काढून करण्यात आली. यामध्ये बीसीए, बीबीए, बीएएस, आयएमसीए व एमसीए चे विद्यार्थी सहभागी झाले. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी झेंडा दाखवून प्रभातफेरीचा शुभारंभ केला. मार्गदर्शन व चर्चासत्र उपक्रमात राष्ट्रीय सेवा एककाचे अधिकारी प्रा. योगेश कोळी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथी नानाभाऊ बहुजुर यांनी विद्यार्थ्यांना एडस् बद्दल सखोल माहिती, एडस् रोगग्रस्त होण्याची प्रमुख कारणे, एडस् बद्दल समाजात असलेले गैरसमज याबाबत चर्चा व मार्गदर्शन केले. परिसंस्थेचे उपसंचालक तथा एमसीए व आयएमसीए विभागप्रमुख मनोज वेडे यांनी मार्गदर्शन करताना एडस् बद्दल माहिती या एक दिवसासाठी मर्यादित न ठेवता वास्तवस्थळी लक्षात ठेवावी, तसेच समाज असलेल्या चालीरीतून ठेव मानसा न बाळगता सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उपक्रमात एमसीए, आयएमसीए, बीसीए, बीबीए व बीएएस च्या वर्गातील एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात एमसीए प्रथम वर्ष विद्यार्थी प्रथम पारितोषिक एकुल शिरसाठ, एमसीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी पेन्सी पाटील हिला द्वितीय पारितोषिक, बीएएस तृतीय वर्षाची विद्यार्थिनी अश्विनी पाटील तृतीय पारितोषिक मिळाले. नानाभाऊ बहुजुर व सचिन माळी यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्लोगन प्रेझेंटेशन स्पर्धेत एकूण २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात प्रथम पारितोषिक बीसीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सविता पावरी, द्वितीय पारितोषिक बीसीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सोनिया वर्मा, तृतीय पारितोषिक चतुर्थ वर्षाची विद्यार्थिनी पेंटासी हिरी हिला मिळाले. जनजागृती ब्रम्हमंचुषा या ऑनलाईन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Deshonnati Edition
Dec 11, 2022 Page No. 1
Powered by : epaper.com

वार्ता 13-12-2022

आर. सी. पटेल आय. एम. आर. डी. परिसंस्थेत सी. एस. आय. ब्रांच द्वारा सायबर सिक्युरिटी अवेअरनेस बाबत पथनाट्य



शिरपूर - आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर. डी. परिसंस्थेत स्टुडंट ब्रांच ऑफ इंडिया (सी.एस.आय.) द्वारा सायबर सिक्युरिटी अवेअरनेस या विषयावर परिसंस्थेतील आय.एम.सी.ए. अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील एकूण २० विद्यार्थ्यांनी आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालय, एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालय, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अश्या विविध ठिकाणावर पथनाट्य सादर केले.

या पथनाट्यात त्यांनी तरुण मंडळींनी आपली महत्त्वपूर्ण माहिती सोशल मिडीयावर टाकण्यापूर्वी विचारपूर्वक टाकावी नाहीतर अन्यथा त्या महितीचा दुरुपयोग होऊ शकतो याची काळजी घेणे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

वयोवृध्द मंडळीकडून बँकेची गुपित माहिती फोन द्वारे मिळवून आर्थिक फसवणूक होते त्यापासून कसे सावध रहावे, एटीएम पिन कोड किंवा कुठलाही पासवर्ड हा गुपीत ठेवणे अश्या विविध मुद्यांवर या पथनाट्याद्वारे संदेश देण्यात आला.

सायबर सिक्युरिटी अवेअरनेस या विषयावर पथनाट्य सादरीकरण करण्यासाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एम.सी.ए. व आय. एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा. मनोज बेहेरे आणि सी.एस.आय. ब्रांच को-ऑर्डीनेटर प्रा. छाया पाटील यांनी विशेष परिश्रम घेऊन या पथनाट्याचे यशस्वीपणे सादरीकरण केले.

आयएमआरडीत संविधान दिन साजरा

तिलपूर

आर.सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत संविधान दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. परिसंस्थेचे उपसंचालक व एमसीए विभागप्रमुख प्रा.मनीष बोरोले यांनी भारत लोकशाहीचा पाया या विषयावर आणि संविधानाचे कार्य, महत्त्व विषद करतांना आधुनिक काळात भारतीय घटनेपुढचे कार्य मांडले.

संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. मनोज पटेल व उपस्थितांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. विनय राणे यांनी केले. परिसंस्थेच्या संचालिका डॉ.प्रेरणा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. पत्नी विभाग प्रमुख डॉ.सुधा पटेल, राहुल सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश शेलोडे, महाव्यवस्थापक कार्यक्रम अधिकारी प्रा.विनय राणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. मनोज बोरोले, प्रा.सोनाली किनगे, प्रा.विद्युत पाटील, प्रा.सौम्यदीप सक्सेना, प्रा. विशिष्ट पाटील, प्रा. पूजा महाजन, प्रा. पल्लवी पाटील, प्रा. किर्तिका बोरोले, प्र. हिमांशी राजपूत, प्रा. ऐश्वर्या पाटील, राहुल सेवा योजना विद्यार्थीनी वृंद उपस्थित होते.



दीक्षिता गुरवचा पारितोषिकाद्वारे सत्कार

तिलपूर

आरसीपी आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयातील १२ वी वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी दीक्षिता प्रमोद गुरव या विद्यार्थिनीने नाशिक विभागात मराठी विषयात प्रथम क्रमांक पटकाविल्याने तिचा १० डिसेंबरला पारितोषिक देवून सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातील १२ वी वाणिज्य शाखेतून दीक्षिता प्रमोद गुरव हिने नाशिक विभागात मराठी विषयात १०० पैकी ९७ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविल्याचे मुक्तसंच नाशिक मंडळाकडून जाहीर करण्यात आले. नाशिक बोर्ड कडून जाहीर झालेले रु. २५,००० रोकड व शाल-श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.



सत्कार सोहळा शिक्षण मंडळाचे चिटणीस पी. एस.सेलकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रसंगी शेठजी स्मृती पारितोषिक जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात तिचा सत्कार करण्यात आला.

सत्कार प्रसंगी मंचावर अध्यक्ष मानद सचिव शिक्षण मंडळ आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष शशांतीपाल भंडारी, सभासद सौ.डॉ. उमेदा आर्या, प्राचार्य पी.व्ही. पाटील, पर्यवेक्षक एस. ई. चौधरी, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी कौतुक केले. तिला मराठी विषय शिक्षक एस.आर.पाटील व सौ.मती आर.ए.जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

सावळदे येथे दोरीक समाजातर्फे सामूहिक विवाह



तिलपूर

तालुक्यातील सावळदे येथे श्री निवांतेवी भक्त मंडळातर्फे दोरीक समाजाचा सातवा सामूहिक कन्यादान (लग्न) विधी व विवाह सोहळा नुकताच पार पडला.

विवाह सोहळ्यासाठी दोन दिवसांत तब्बल सोळाहून हजार लग्नांची उपस्थिती होती. आमदार काशीराम पावरा, विश्वदर्शिनी भूतनिवासीचे उपाध्यक्ष प्रभाकर चव्हाण यांनी नवविवाहित दांपत्यांना आशीर्वाद दिले. सावळदे गावातून दोरीक समाजातील महाने व परखई परिसरातील कुलदैवत असलेले श्री निवांतेवीचे मंदिर याठिकाणापर्यंत आणले. यानंतर तेथील प्रांगणात गेल्या दहा वर्षांपासून सामूहिक मौंज, विवाह, साखरपुडा सोहळ्याचे आयोजन मंडळाच्या वतीने विनामूल्य केले जाते. लोकसहभागातून या उपक्रम राबविला जात असून त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य लाभले.

पाच मौंज, तीन विवाह : यंदाच्या वर्षी दहा मंडलिक, मुख मंडलिक, सवपान, मेहुल व चेतन या पाच बहुचा मौंज विधी झालाय. यामध्ये विवाही स्वप्नील-पूनम, मेहुल-कार्यवती व चेतन-उमाजी यांचा विवाह सोहळा पार पडला.

एसव्हीकेएम फार्मसीचे अविष्कार स्पर्धेत यश

(पान १ वरून)विद्यार्थीना स्वतंत्र फेलोशिपी मिळत असते.

या स्पर्धेच्या पारितोषिकासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव गोकल यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचा समन्वयक प्रा.मृणाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष मानी संघी आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सभासद शशांतीपाल भंडारी, धुळे केंद्रप्रमुख संजय अहिराव, डॉ. अजय जगदी यांनी अभिनंदन केले.




इन्व्हर्टर
इन्व्हर्टर
इन्व्हर्टर

लोकमत

शिरपूरला कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर येथील आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत युवती सभा अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन परिसंस्थेतील सर्व द्वितीय बी.सी.ए. बी.बी.ए., बी.एम.एस. वर्गातील युवतींसाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट्ये युवतींना प्रेम, मैत्री व आकर्षण यांतील फरक समजावून सांगणे हा होता.डॉ. वैशाली पाटील यांनी त्यांच्या व्याख्यानाद्वारे विद्यार्थीनींना प्रेम व मैत्री यांतील गैरसमज बद्दल जागरुक केले.डॉ. वैशाली पाटील यांनी प्रश्नोत्तराद्वारे युवतींच्या समस्यांचे निरसन केले. या चर्चेत त्यांनी पालक आणि मुलगी यांच्यातील संवादाचे अंतर स्पष्ट केले.

कार्यशाळेत परिसंस्थेतील ११३ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेमुळे वास्तविक जगाच्या परिस्थितीतील आत्मविश्वासाने सामोरे कसे जावे या बद्दल माहिती मिळाली असे विद्यार्थिनींनी आपल्या अभिप्रायात नमुद केले. यावेळी प्रा.छाया पाटील उपस्थित होत्या.

Hello Dhule
Page No. 3 Dec 13, 2022
Powered by: erelego.com

देशोन्नती

आय.एम.आर.डी. परिसंस्थेत युवती सभा अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न



देशोन्नती वृत्तसंकलन...

शिरपूर ■ येथील आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत युवती सभा अंतर्गत प्रेम, आकर्षण व मैत्री या कार्यशाळेचे आयोजन परिसंस्थेतील सर्व द्वितीय बी.सी.ए. बी.बी.ए., बी.एम.एस. वर्गातील युवतींसाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्टये युवतींना प्रेम, मैत्री व आकर्षण यांतील फरक समजावून सांगणे हा होता. या कार्यशाळेसाठी व्याख्याता म्हणून परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी त्यांच्या व्याख्यानाद्वारे विद्यार्थीनींना प्रेम व मैत्री यांतील गैरसमज बद्दल जागरुक केले. तसेच किशोरवयीन मुलींमध्ये विशेषतः पौगंडावस्थेत जेव्हा प्रेम, आकर्षण आणि मैत्री या गोष्टी घडतात त्या बदल मुलींना जागरुक केले. डॉ. वैशाली पाटील यांनी प्रश्नोत्तराद्वारे युवतींच्या समस्यांचे निरसन केले. या चर्चेत त्यांनी पालक आणि मुलगी यांच्यातील संवादाचे अंतर स्पष्ट केले.

कार्यशाळेत परिसंस्थेतील ११३ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेमुळे वास्तविक जगाच्या परिस्थितीत आत्मविश्वासाने सामोरे कसे जावे या बद्दल माहिती मिळाली असे विद्यार्थिनींनी आपल्या अभिप्रायात नमुद केले.

परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युवती सभा समन्वयिका प्रा. छाया पाटील, प्रा. रोहिणी पाटील, प्रा. प्रियंका सैंदाणे, प्रा. विजेता सोनगिरे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

Deshonnati Edition
Dec 13, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

KishorMali Sir
Today, 12:35 am

Warta13-06-2022

आर. सी. पटेल आयएमआरडी बी. बी. ए. व बी.एम. एस. च्या विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मध्ये निवड



शिरपूर – येथील आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचालित आयएमआरडी परिसंस्थेतील पदवी विभागातील बी.बी.ए. व बी.एम.एस. च्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची विविध कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट द्वारे निवड करण्यात आली.

इन्फोसीस बी.पी.एम. या कंपनीत बी.बी.ए. अंतिम वर्षाचे व्यास आदित्य प्रमोद, वाणी श्वेता गिरीश, सोनार साक्षर भटू, पाटील प्रमोद प्रकाश, राजपूत नयन विजयसिंग, शिरसाठ प्रशांत हिरालाल, पाटील किरीट संजय, पवार मधुर राजेश, पाटील पुष्कर विकास या विद्यार्थ्यांची निवड झाली. टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस या कंपनीत बी.एम.एस. अंतिम वर्षाचे पिंपे अनुष्का विकास, एडसी ऋचा विनोद, पाटील दिव्या सुनील, जाधव सिद्धि हरिओम, कलाल गोविंद विनोद व बी.बी.ए. अंतिम वर्षाचा कोतवाली सुयश किशोर या विद्यार्थ्यांची निवड झाली. तर डाबर इंडिया लिमिटेड, बेंगलोर या कंपनीत बी.एम.एस. अंतिम वर्षाची पाटील तेजस्विनी गोपाळ या विद्यार्थिनीची निवड झाली. यात पदवी विभागासाठी (बी.बी.ए व बी.एम.एस.) सर्वोच्च ३ लाख रुपये वेतनाचे पॅकेज मिळाले तर सरासरी पॅकेज २.४० लाख वेतनाचे मिळाले.

प्रथम फेरी मध्ये सर्व कंपनी द्वारे ऑप्टिट्यूड टेस्ट घेण्यात आली. ऑप्टिट्यूड टेस्ट मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन इंटरव्यू घेण्यात आले. या प्रक्रियेत आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचालित आयएमआरडी परिसंस्थेतील विद्यार्थ्यांची सर्व फेरीत निवड करण्यात आली.

परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनखाली प्लेसमेंट चे आयोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अर्चना जडे व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समितीने केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मानद सचिव आ. अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजमोहन भंडारी, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, एम.सी.ए. व आय.एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा.मनोज बेहेरे, एम.एच.एस. विभागप्रमुख व आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी केले.

REPLY

दि. १३/०६/२०२२ वार्ता

आर. सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत शिवस्वराज्य दिन रासेयो एककाच्या माध्यमातून साजरा



शिरपूर - आर. सी. पटेल आयएमआरडी परिसंस्थेत शिवस्वराज्य दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या माध्यमातून शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन व शिवस्वराज्य गुढी उभारून करण्यात आली. रा.से.यो. स्वयंसेवक, परिसंस्थेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. जयेश पाटील या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराजांवर एक पोवाडा सादर करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली. निवेदिता ठाकार या विद्यार्थिनीने किल्ले रायगड ची माहिती व त्याचे महत्व स्पष्ट केले. कु. हिमानी पाटील हिने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील परिवर्तनशील एका पर्वाचे अभिवाचन केले. प्रा. विजय गर्दे यांनी शिवस्वराज्य दिनाचे विशेष महत्व स्पष्ट केले. महाराष्ट्र गीताचे सादरीकरण कु. खुशबु सिंग, कु. मेघा सुरवे , कु. लक्ष्मी वेंडीराव, कु.निवेदिता ठाकार यांनी केले. सूत्रसंचालन करुन कु. हर्षदा सोनवणे हिने आभार मानले.

कार्यक्रमाधिकारी पंचायत समितीच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल विचार मांडून आजच्या तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार अनुसरावे असे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. छाया पाटील, समिती सदस्य प्रा. विवेक वरुळे, प्रा. सुरज निकम, प्रा. गिरिनिद पाटील, दीपक दोरिक, रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



आर.सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेला उमविच्या अॅकॅडमिक ऑडीटमध्ये ए ग्रेड प्रदान

शिरपूर, दि.१३- उत्तर महाराष्ट्र परिक्षेत्रात अग्रगण्य परिसंस्था म्हणून नावलौकिक असणाऱ्या आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय. एम. आर. डी. परिसंस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्न महाविद्यालयांच्या अॅकॅडमिक ऑडिट मध्ये आय.एम.आर.डी. परिसंस्थेला 'ए' ग्रेड प्राप्त झाल्याची माहिती संचालिका प्रा.डॉ.वैशाली पाटील यांनी दिली.

